**महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहूउद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई (मुख्यालय) आणि जिल्हा बँकांची सतत व समवर्ती लेखापरीक्षण योजनेअंतर्गत निर्माण केलेली अस्थाई पदे चालू ठेवण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : एलडीबी-१००९/प्र.क्र.२९८(भाग-२)/७ स,**
मंत्रालय , मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ०१ एप्रिल, २०२६

**संदर्भ :** १) शासन निर्णय समक्रमांक दिनांक १६/०९/२०२५
२) शासन निर्णय वित्त विभाग क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि. २८फेब्रुवारी, २०२६

**शासन निर्णय :-**

उपरोक्त संदर्भ क्रमांक १ येथील समक्रमांकाच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय विकास बँक मर्या., मुंबई या शिखर बँकेच्या लेखापरीक्षणासाठी असलेली ९ पदे व जिल्हा बँकांच्या लेखापरीक्षणासाठी असलेली ४१ पदे अशा एकूण ५० पदांना दि. २८/०२/२०२६ पर्यंत पूढे चालू ठेवण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे.

**२.** सहकार खात्यांतर्गत लेखापरीक्षण विभागातील पदांच्या आढाव्याबाबतच्या आकृतीबंधामध्ये महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुद्देशिय विकास बँक म. मुंबई (मुख्यालय) (९ पदे) आणि जिल्हा बँकांच्या (४१ पदे) लेखापरीक्षणासाठी असलेल्या ५० पदांचा समावेश आहे.

**३.** विभागांतर्गत मंजूर स्थायी /अस्थायी पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्याच्या कार्यवाही अंतर्गत महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुउद्देशिय बँक मर्या., मुंबई (मुख्यालय) व जिल्हा बँकांच्या सतत व समवर्ती लेखापरिक्षणाच्या पदांच्या सुधारित आकृतीबंधास उच्चस्तर सचिव समितीची मान्यता मिळाली असून, त्या संबंधीचा शासन निर्णय क्र. राजस-१००८/प्र.क्र.५३८/५स दिनांक ५/५/२०११ रोजी निर्गमीत करण्यात आलेला आहे.

**४.** ९७ व्या घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यातील सहकारी संस्थांच्या लेखापरीक्षणासाठी सनदी लेखापाल फर्म / सनदी लेखापाल/ प्रमाणित लेखापरिक्षक व खात्यांच्या लेखापरिक्षकांची नामतालिका प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्यात बहुतांश कर्मचाऱ्यांचा समावेश आहे व जे कर्मचारी पॅनलवर येण्यासाठी पॅनेलच्या

अटीनुसार अपात्र ठरलेले आहेत ते कर्मचारी पॅनेलवर आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांना मदत करणार आहेत. तसेच सदर घटना दुरुस्तीच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये झालेले बदल पाहता आकृतीबंधातील मंजुरीनुसार लेखापरिक्षण विभागातील एकुण ३९९५ पदांच्या पुर्नरचनेच्या प्रस्तावाची छाननी करण्याचे काम चालु असुन या छाननीस अवधी लागणार असल्याचे नमुद करुन सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुद्देशिय विकास बँक म. मुंबई या शिखर बँकेच्या लेखापरीक्षणासाठी असलेली ९ पदे आणि जिल्हा बँकांच्या लेखापरीक्षणासाठी असलेली ४१ पदे अशा एकूण ५० पदांना सन २०२६-२०२७ मध्ये चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केलेला आहे. वित्त विभागाच्या दि. २८/०२/२०२६ च्या शासन निर्णयानुसार प्रशासकिय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार लेखापरिक्षणासाठी असलेल्या विवरण पत्र 'अ मधील ५० अस्थायी पदांना दि. ०१/०३/२०२६ ते दि. ३१/०८/२०२६ पर्यंत चालू ठेवण्यास याद्वारे शासन मंजुरी देण्यांत येत आहे.

**५.** संपूर्ण लेखापरीक्षण शुल्काची (ऑडिट फी) वसुली करण्याची पूर्णत: दक्षता सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी घ्यावी. तसेच लेखापरीक्षणासाठीच्या कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाइतके लेखापरीक्षण शुल्क वसुलीची कार्यवाही प्रथम तात्काळ करावी व पुढील मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करताना लेखापरीक्षण शुल्काची एकूण संचित थकबाकी पुर्णपणे वसूल झालेली असावी.

**६.** वर नमूद केलेल्या जिल्हा बँकांसंदर्भात पदांचे जिल्हावार वाटप सोबतच्या विवरण पत्र "अ" मध्ये दर्शविलेले आहे. सदरहू पदांच्या आहरण व संवितरण अधिकारी निहाय वाटपाबाबतचा तपशिल सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी महालेखापाल, महाराष्ट्र-१, महालेखापाल, महाराष्ट्र-२, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई व संबंधित जिल्हा कोषाधिकारी यांना थेट पाठवावा व त्यांची एक प्रत माहितीसाठी शासनास पाठवावी.

**७.** सदर कर्मचा-यांवर होणारा खर्च (ज्यात रजावेतन व निवृत्ती वेतन, वर्गणी इत्यादीचा समावेश होतो) दि महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुद्देशीय विकास बँक, मुंबई या बँकेकडून आणि सर्व जिल्हा बँकांकडून लेखा परीक्षा फी च्या स्वरुपात वसूल करण्यात यावा.

**८.** या साठी होणारा खर्च हा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मागणी क्रमांक - व्ही-२, मधील अर्थसंकल्पीय लेखाशिर्ष "२४२५-सहकार, (००) १०१ सहकारी संस्थाची लेखापरीक्षा, (०१) (०१) लेखापरीक्षेसाठी कर्मचारी वर्ग- (२४२५ ०२२ ७)" या लेखाशिर्षाखाली सन २०२६-२०२७ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

**९.** हा शासन निर्णय वित्त विभागाच्या संदर्भ क्र. २ येथील शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या अधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

**१०.** सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४०११४४०५४१४०२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने स्वाक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB176442575037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA6167409EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.04.01 14:42:04 +05'30'

**सहपत्र :-** विवरण पत्र "अ"

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सहसचिव,**
**महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१) महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) मुंबई ( २ प्रती ).
२) महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा/लेखा व अनुज्ञेयता) नागपूर ( २ प्रती ).
३) वित्त विभाग, कार्यासन व्यय-२, मंत्रालय, मुंबई.
४) कार्यासन अधिकारी, १७-स, ५-स, १२-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय,मुंबई.
५) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
६) विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था (सर्व).
७) सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य सह कृषि ग्रा. बहु. विकास बँक मर्या., मुंबई.
८) सहनिबंधक सहकारी संस्था (लेखापरीक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे ( ५ प्रती)
९) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, जळगाव / अहमदनगर/ पुणे/कोल्हापूर/ सातारा/ छत्रपती संभाजीनगर / नांदेड / धाराशीव /अकोला/ अमरावती व नागपूर.
१०) प्रशासक/अवसायक, महाराष्ट्र राज्य सहकारी कृषि ग्रामीण बहुद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई / सर्व जिल्हा सहकारी कृषि व ग्रामिण बहउद्देशीय विकास बँका.
११) विशेष लेखापरीक्षक, जिल्हा सहकारी कृषि ग्रामीण बहुद्देशीय विकास बँक मर्या., मुंबई/ नाशिक/ जळगाव/ अहमदनगर / पुणे / कोल्हापूर / सातारा / छत्रपती संभाजीनगर / नांदेड / धाराशीव / अकोला/ अमरावती व नागपूर.
१२) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
१३) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
१४) जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई/ नाशिक/ जळगाव/ अहमदनगर/ पुणे/कोल्हापूर / सातारा/ छत्रपती संभाजीनगर / नांदेड / धाराशीव / अकोला / अमरावती व नागपूर.
१५) निवड नस्ती.

**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,**
**शासन निर्णय, क्रमांक:-एलडीबी- १००९/ प्र.क्र.२९८(भाग-२)/७-स,दिनांक- ०१ एप्रिल, २०२६**

**विवरणपत्र “अ”**

**जिल्हानिहाय अस्थायी पदे वाटप केलेला तक्ता.**

| जिल्हयाचे नांव | सह निबंधक | वि.ले.प. वर्ग-२ | ले.प. श्रेणी-१ | ले.प. श्रेणी-२ | लघु लेखक कनिष्ठ | उप ले.प. | कनिष्ठ लिपिक | शिपाई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **मुंबई मुख्यालय** मुंबई | १ | १ | १ | --- | १ | ३ | १ | १ | **९** |
| **नाशिक विभाग** | | | | | | | | | |
| १.नाशिक | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| २.जळगांव | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| ३.अहमदनगर | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| **एकूण** | -- | **३** | **--** | **३** | **--** | **३** | **३** | **--** | **१२** |
| **पुणे विभाग** | | | | | | | | | |
| १.पुणे | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| २.कोल्हापूर | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | १ | **५** |
| ३.सातारा | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- |
| **एकूण** | | **२** | **--** | **२** | **--** | **२** | **२** | **१** | **९** |
| **छत्रपती संभाजीनगर विभाग** | | | | | | | | | |
| १.छत्रपती संभाजीनगर | -- | १ | -- | १ | -- | १ | -- | -- | **३** |
| २.नांदेड | -- | १ | - | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| ३.धाराशीव | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | -- | **०** |
| **एकूण** | -- | **२** | **--** | **२** | **--** | **२** | **१** | **--** | **७** |
| **अमरावती विभाग** | | | | | | | | | |
| १.अकोला | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| २.अमरावती | -- | १ | -- | १ | -- | १ | १ | -- | **४** |
| **एकूण** | | **२** | **--** | **२** | **--** | **२** | **२** | **--** | **८** |
| **नागपूर विभाग** | | | | | | | | | |
| नागपूर | -- | १ | -- | १ | -- | १ | २ | -- | **५** |
| **राज्याची एकूण पदे** | **१** | **११** | **१** | **१०** | **१** | **१३** | **११** | **२** | **५०** |

SANTOSH ARUN PATIL

Digitally signed by SANTOSH ARUN PATIL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CMTD, 2.5.4.20=CA78467BCC4594E1E11741A7962A7A83FEAFB17644257 5037160FC343C4AE5AB, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=E52439642AB57C332B2A3E3E46F0D907BA616740 9EF6D52C943BF775ECF042FD, cn=SANTOSH ARUN PATIL
Date: 2026.04.01 14:42:31 +05'30'

**(संतोष पाटील)**
**अपर निबंधक तथा सहसचिव,**
**महाराष्ट्र शासन**